
# वाघाच्या हल्ल्यात तरुणाचा मृत्यू

## कुलंगना खुर्दजवळील मोझरी महादेव खोऱ्यातील घटना | गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, (दि.19)**– चिखलदरा तालुक्यातील कुलंगना खुर्दजवळ सोमवारी सकाळी दर्शनासाठी गेलेल्या दोन युवकांपैकी एका तरुणाचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. प्रवीण सुखराम बेलसरे (18) रा. कुलंगना खुर्द असा मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव असून, त्याचा मित्र सुदैवाने वाघाच्या तावडीतून बचावला.





सविस्तर वृत्त असे की, श्रावण महिन्याच्या चौथ्या सोमवारी कुलंगना खुर्दजवळील सुमारे तीन किलोमीटरवर असलेल्या मोझरी महादेवाच्या गुहेत दर्शनासाठी गावातील प्रवीण बेलसरे व त्याचा मित्र गोविंद कासदेकर गेले होते. मात्र रात्री उशिरापर्यंत प्रवीण घरी न परतल्याने नातेवाईकांनी शोधमोहीम सुरू केली. मंगळवारी सकाळी गावातील 50-60 नागरिकांनी पुन्हा शोध घेतला असता सकाळी आठ वाजताच्या सुमारास थुवा नाल्यात प्रवीणचा मृतदेह आढळला. दरम्यान, प्रवीणसोबत गेलेला गोविंद कासदेकर मात्र सुदैवाने वाचला. तो रात्री जंगलातून पळून शेतीशिवारातील झोपडीत पोहोचला आणि सकाळी घरी परतला. त्यामुळे गावकऱ्यांनी सुटकेचा निश्वास सोडला.



प्रविण बेलसरे    गोविंद कासदेकर

सदर घटनेची माहिती मिळताच उपवनसंरक्षक राजेश रत्नपारखी, वनपरिक्षेत्र अधिकारी अर्चना अलोकार, वनपाल प्रदीप बाळापुरे, वनरक्षक शेंडे व चिखलदरा पोलीस स्टेशनचे पीएसआय प्रशांत मसराम यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतकाच्या कुटुंबीयांना 25 लाख रुपयांची मदत देण्यात येणार असल्याची माहिती मेळघाट वन्यजीव विभागाचे वनसंरक्षक राजेश रत्नपारखी यांनी दिली. या दुर्दैवी घटनेनंतर परिसरात वाघाच्या हालचालींमुळे भीतीचे वातावरण पसरले आहे.

### घटनास्थळीच वाघाची डरकाळी

मृतदेहाजवळ वाघाचे पंजाचे ठसे, शरीरावर खोल जखमा, डावा पाय माडीपासून तुटलेला व डावा हाताचा पंजा गायब असल्याचे आढळले. घटनास्थळीच वाघाची डरकाळी ऐकू आली, ज्यामुळे उपस्थित ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.

### दोन वर्षात 6, तर वर्षभरात 4 ठार

गेल्या दोन वर्षात मेळघाटात 7 लोकांना वाघाने ठार केले, तर 4 लोक गेल्या वर्षभरात मृत्यूमुखी पडले.

**12 जून 2023 :** मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गुगामल वन्यजीव विभागातील माताकोल संरक्षण कॅम्पनजीक कारा येथे निस्ताराचे बांबू तोडण्यासाठी जंगलात गेलेल्या एका युवकावर वाघाने हल्ला केल्याची घटना सोमवार 12 जून रोजी दुपारी घडली होती. या युवकाला वाघाने फरफटत दरीत ओढून नेले होते. घटनास्थळी त्याचा मोबाईल, पॅन्ट, रक्ताचे शिंतोडे मिळाले होते. राजेश रतिराम कास्देकर (28, रा. कारा) असे त्या युवकाचे नाव होते.

**3 नोव्हेंबर 2024 :** हरीसाल वन वर्तुळाअंतर्गतच केसरपूर येथील रहिवासी हरिराम धिकार नामक इसमावर रविवारी (दि.3) रोजी वाघाने हल्ला करुन त्याला ठार केले होते. हरिराम हा जंगलात लाकडे तोडण्यासाठी गेला होता. दरम्यान जंगलात दबा धरून बसलेल्या वाघाने एकाएकी त्याच्यावर हल्ला केला. यात हरिराम जागीच मृत्युमुखी पडला.

**3 मार्च 2025 :** चिखलदरा तालुक्यातील जमली वन गावापासून काही अंतरावर रविवारी रात्री दुचाकीनं जाणाऱ्या युवकावर वाघानं हल्ला करून त्याला जंगलात एक किलोमीटर आतमध्ये ओढत नेऊन ठार मारल्याची घटना समोर आली. विनोद चिमटे (वय 26) असे मृत युवकाचे नाव होतो. विनोद खोंगडा येथून बाजारातून मासेविक्री करुन परत येत असताना ही घटना घडली होती.

**4 जून 2025 :** धारणी तालुक्यातील हरीसाल येथे मन्नू बाबला जावरकर (वय 60 रा.हरिसाल) याची वाघाने शिकार केल्याची धक्कादायक घटना समोर आली. हा घटनेच्यावेळी लाकडी मोळी आणण्याकरिता जंगलात गेला होता.

**25 जुलै 2025 :** चिखलदरा तालुक्यातील बारुखेडा गावाच्या जंगल परिसरात दोन युवक अचानक बेपत्ता झाले होते. त्यापैकी एक तरुण सुखरूप सापडला, तर दुसऱ्या युवकाला वाघाने संपविले होते.

**18 ऑगस्ट 2025 :** चिखलदरा तालुक्यातील कुलंगना खुर्द येथील दोन युवक सोमवार दि 18 आंगस्ट रोजी प्रवीण सुखराम बेलसरे (वय 18 वर्ष) याचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला.

## ...अनोखी कॅमेरा दिंडी!



**अमरावती** – जागतिक छायाचित्र दिनानिमित्त अंबानगरी फोटो-व्हिडिओग्राफर्स असोसिएशनतर्फे आज, 19 ऑगस्ट रोजी भव्य 'कॅमेरा दिंडी' चे आयोजन करण्यात आले. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या प्रवेशद्वाराजवळून पालखीला सुरवात झाली. या वेळी अध्यक्षस्थानी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य निवेदिता चौधरी होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून यश खोडके आणि युवा कार्यकर्ता शिवानंद चौधरी उपस्थित होते. मान्यवरांचा सत्कार करून शहरातील प्रमुख मार्गांवरून उत्साहात निघालेल्या या दिंडीने वेगळेच आकर्षण निर्माण केले.

# अनु. जमाती कल्याण समितीचा दौरा गुणकारी ठरणार का?




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.19)**– अनुसूचित जमाती कल्याण समितीचा दौरा आजपासून सुरू झाला आहे. समिती उद्यापासून दोन दिवस धारणी आणि चिखलदरा तालुक्याचा दौरा करणार आहे. मात्र अनेक समस्यांनी ग्रासलेल्या आदिवासी समाजाकरिता या समितीचा दौरा गुणकारी ठरणार का? असा प्रश्न मेळघाटवासीयांकडून वारंवार उपस्थित केला जात आहे.

मेळघाटमध्ये आदीवासींच्या नावावर विविध योजना आणल्या जातात, आणि त्या योजनांचा लाभ आदीवासींपेक्षा अधिकारी आणि कंत्राटदारांनाच अधिक होतो. अनेक आश्रमशाळा अश्या आहेत ज्या ठिकाणी आदीवासी विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध करवून दिलेल्या सुविधा शाळेचे मुख्याध्यापक व त्यांचे नातेवाईक घेताहेत. विद्यमान आमदारांच्या स्वतःच्या सलोना, जामली आणि नागापूर येथे आश्रमशाळा आहेत, त्यांच्या शाळांची दुरावस्था सांगणारी घटना नुकतीच घडली. 14 वर्षीय विद्यार्थीनी सुमती जामुनकर हिला आपला जीव गमवावा लागला. ही समिती या प्रकरणी तपास करुन अपघात घडलेल्या शाळेला सील ठोकणार का?, या संस्थेअंतर्गत किंवा इतर सर्व शाळांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचे आदेश देईल का?, स्ट्रक्चरल ऑडीट हे थर्डपार्टी एजन्सीकडून होणार का?, विद्यार्थ्यां खरचं डायट प्रमाणे भोजन दिले जात आहे का?, मेळघाटातील रिक्त जागांसाठी काही महत्वाचे पाऊल उचलल्या जाईल का? असे एक ना अनेक प्रश्न अनुत्तरित आहे, ज्या प्रश्नांचे उत्तर समितीच्या पुढील दोन दिवसांच्या दौऱ्यातून स्पष्ट होईल.

### जारीद्याला भेट देईल का समिती?


मेळघाटमधील सर्वात मोठी शासकीय आश्रमशाळा ही जारीद्याला आहे. या शाळेमध्ये मुलांना धावण्याकरिता करण्यात आलेला ट्रॅक गवतामध्ये गुडूप झाला आहे, प्रेक्षक गॅलरीच्या नावावर कसंतरी, काहीतरी बांधकाम करण्यात आले आहे. येथील खेळाचे साहित्य गायब आहे, हल्लीच येथे लॅपटॉप चोरीची घटना घडली होती, येथील मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आहे. समिती दोषींवर काय कारवाई करते आणि काय सुधारणा करण्याचे आदेश देते, हे बुधवारच्या दौऱ्यादरम्यान पाहण्यासारखे ठरेल.

### अनेकांची निवेदने स्विकारली

अनुसूचित जमाती कल्याण समितीचा दौरा आज पार पडला. शासकीय विश्रामगृहात सकाळी झालेल्या चर्चेत जिल्ह्यातील नागरिक, लोकप्रतिनिधी व संस्थांचे निवेदने स्विकारली गेली. त्यानंतर समिती प्रमुख दौलत दरोडा व सदस्य केवलराम काळे, राजू तोडसाम, शांताराम मोरे, मंजुळा गावित, रामदास मसराम, उमा खापरे, राजेश राठोड, विनोद निकोले यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विभागांचा आढावा घेतला. नगरपालिका, पोलीस, वीज वितरण कंपनी, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, कृषी, महिला व बालविकास आदी विभागांच्या कामकाजावर सविस्तर चर्चा झाली. पदभरती, आरक्षण, जात पडताळणी आणि आदिवासी उपयोजना क्षेत्रातील योजनांच्या अंमलबजावणीसाठी समितीने उपयुक्त सूचना दिल्या.

# पूर्णा मध्यम प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग

## नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, (दि.19)**– तालुक्यातील पूर्णा मध्यम प्रकल्पात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसामुळे पाण्याचा साठा झपाट्याने वाढत आहे. आज दुपारी 5 वाजताच्या स्थितीनुसार प्रकल्पातील पाणीपातळी 450.34 मीटर असून एकूण साठा 28.09 द.ल.घ.मी. म्हणजेच 79.44 टक्के झाला आहे. दरम्यान, 194 घ.मी.प्र.से. एवढा येवा प्रकल्पात सुरू आहे.

उपअभियंता अनुप खवणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळपासून उघडे ठेवलेले 3 दरवाजे वाढवून दुपारी एकूण 9 दरवाजे 50 सें.मी. उंचीवरून उघडण्यात आले. त्यामुळे 367.38 घ.मी.प्र.से. एवढा पाण्याचा विसर्ग पूर्णा नदीपात्रात करण्यात आला आहे. पुढील काळात मध्यप्रदेशात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा परिणाम या प्रकल्पावर होणार असून, येणाऱ्या आवकेनुसार विसर्गाचे प्रमाण वाढवणे अथवा कमी करणे याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. या विसर्गामुळे नदीकाठच्या गावांमध्ये पाणीपातळी वाढण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने संबंधित सर्व यंत्रणांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, काजळी व देऊरवाडा परिसरात पूर्णा नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत असल्याचे चित्र दिसत आहे. नागरिकांनी नदी-नाल्यांच्या परिसरात जाण्याचे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नदीत बुडून 8 वर्षीय बालकाचा मृत्यू

## कुलंगनावर काळाचा दुहेरी घाला

**महासागर प्रतिनिधी**

**चिखलदरा, (दि. 19)**– तालुक्यातील कुलंगना खुर्द गावात नदीत बुडून एका 8 वर्षीय बालकाचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना सोमवारी संध्याकाळी घडली. मृत बालकाचे नाव आनंद रामकिसन मावस्कर (8) असे आहे. आनंद नदीत वाहून गेल्यानंतर गावकऱ्यांनी शोधमोहीम सुरू केली. जवळपास तीन तासांच्या शोधानंतर अखेर आनंदचा मृतदेह सापडला. दरम्यान, काही दिवसांपूर्वी वाघाच्या हल्ल्यात प्रवीण बेलसरे यांचा मृत्यू झाला होता. त्यात आता नदीत बुडून आनंदचा मृत्यू झाल्याने कुलंगना खुर्द गावात शोककळा पसरली आहे. कुलंगना येथील युवकाचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू आणि बालक वाहून जाण्याची घटना एकाच दिवशी उघडकीस आल्याने कुलंगनावर गावावर काळाचा दूहेरी आघात झाला आहे.



# कोणत्याही क्षणी उघडतील उर्ध्व वर्धा धरणाचे व्दार

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी**–उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये जोरदार पावसामुळे धरणाची पातळी झपाट्याने वाढत असून धरण ओसंडण्याच्या स्थितीत पोहोचले आहे. त्यामुळे येणाऱ्या 24 ते 72 तासांमध्ये धरणाचे दरवाजे कोणत्याही क्षणी उघडले जाऊ शकतात, अशी माहिती प्रकल्प प्रशासनाकडून देण्यात आली आहे. नदीकाठच्या गावांमध्ये धोक्याची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी नागरिकांनी सतर्क राहावे व नदीकाठी जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दरवाजे उघडल्यास मोठ्या प्रमाणात विसर्ग नदीपात्रात सोडला जाणार असल्याने प्रशासनाने संबंधित विभागांना सतर्कतेचे निर्देश दिले आहेत. उपविभागीय अभियंता मनाली नंदागवळी आणि कनिष्ठ अभियंता शुभम जयस्वाल यांनी लोकप्रतिनिधी व ग्रामपंचायतींमार्फत ग्रामस्थांना सतर्कतेची सूचना दिली आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास विसर्गाचे प्रमाण अधिक वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील काही दिवस नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



# सलग चार दिवसांचा पाऊस

## नदी-नाले ओसंडले, शेतकऱ्यांची मोठी हानी



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, (दि.19)**– अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार तालुक्यात गेल्या चार दिवसांपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली असून संपूर्ण तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. मेघा नदीची पाणीपातळी झपाट्याने वाढून शिरजगाव कसबा येथे पुलाच्या वरून पाणी वाहत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

पूर्णा मध्यम प्रकल्पात पाण्याचा मोठा साठा झाल्याने आज सकाळी 9 दरवाजांपैकी 2 दरवाजे उघडण्यात आले. उपअभियंता अनुप खवणे यांनी सांगितले की, विसर्गामुळे खालच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, सततच्या पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. विशेषतः संत्रा उत्पादक पट्टयात झाडे सडण्यास सुरुवात झाली आहे. सर्फाफुर, क्ल्होडी, करजगाव, खरपी या भागातील शेतकऱ्यांची स्थिती गंभीर आहे. माजी आमदार बच्चू कडू यांनी दौरा करून पंचनामे व मदतीसाठी प्रशासनाला निर्देश दिले. तथापि, स्थानिक नागरिकांनी प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यावर 'आपत्कालीन परिस्थितीतही मदतीचे कोणतेही ठोस पाऊल उचलले गेले नाही' असा आरोप करण्यात आला.

चार दिवस उलटूनही पंचनाम्यासाठी अधिकारी शेतात न उतरल्याने शेतकऱ्यांचा संताप वाढला आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहील, असा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने उपाययोजना केल्या नाहीत तर परिस्थिती आणखी बिघडू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे.

### राष्ट्रीय महामार्ग जलमय

तिवसा – शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 6 अतिशय बिकट अवस्थेत आला असून अतिवृष्टीमुळे वाहनचालकांसह शाळकरी विद्यार्थ्यांची मोठी तारांबळ उडत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणांतर्गत असलेल्या कंपनीच्या दिरंगाईमुळे आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे महामार्गावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे निर्माण झाले असून शहरातील मुख्य मार्गावर 200 ते 300 मीटरपर्यंत पाणी साचल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. त्यातच अनेक दिवसांपासून पथदिवे बंद असल्याने रात्री वाहनचालकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

## डोमी गावातील मका पीक उद्ध्वस्त

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, (दि.19)** – सोमवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे डोमी परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अचानक आलेल्या वादळी पावसासह मका पीक वाहून गेले असून शेतात उभे असलेले पिक पूर्णतः उद्ध्वस्त झाले आहे. मुसळधार पावसासोबत आलेल्या वाऱ्यामुळे पिके आडवी झाली, तर काही ठिकाणी पाण्याखाली गेली आहेत.



या भागातील शेतकरी मका पिकावर अवलंबून असतात. हे पीक हंगामी उत्पन्नाबरोबरच पशुखाद्यासाठी उपयुक्त ठरते. मात्र या पावसाने शेतकऱ्यांची कंबर मोडली असून, खर्चसुद्धा निघणार नाही, अशी शेतकऱ्यांची हतबलता आहे. राजाराम सावलकर, नंदराम सावलकर, कालय कास्देकर, भुरा भुसुम यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने पंचनामे करून आर्थिक मदतीची मागणी केली आहे. कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांचा ताण वाढला असून शासनाने त्वरित दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### डोमी गावात पीक गेले वाहून

सोमवारी रात्री 8 ते 10 दरम्यान मुसळधार पावसामुळे डोमी गावातील उभे असलेले मका पीक वाहून गेले; शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.



# माजी आमदार बच्चू कडू यांचा पूरग्रस्त भागाचा दौरा

## मदतीसाठी प्रशासनाला स्पष्ट निर्देश

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, (दि.19)**– 15 ऑगस्ट रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे चांदूरबाजार तालुक्यातील माधान, काजळी, ब्राम्हणवाडा थडी, देऊरवाडा आदी गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर माजी आमदार बच्चू कडू यांनी नुकताच पूरग्रस्त भागांचा दौरा करून प्रत्यक्ष पाहणी केली. नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्यांनी प्रशासनाला तातडीने मदत करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.



कडू यांनी अचलपूरचे उपविभागीय अधिकारी व चांदूरबाजार तहसीलदारांना तातडीने पंचनामे करून अहवाल सादर करण्यास सांगितले. विशेषतः ज्यांचे घरांचे व घरगुती साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे, त्यांना शासनाकडून अधिकाधिक मदत मिळवून देण्यासाठी ते प्रयत्न करतील असे आश्वासन दिले. माधान गावात नाल्याचे पाणी घरात शिरल्याने कपडे, धान्य, अन्नधान्य, अंथरुणपांघरूण यासह महत्त्वाची कागदपत्रे वाहून गेली आहेत. त्यामुळे नागरिकांवर उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला असून, लोकप्रतिनिधींच्या दौऱ्यानंतरही प्रत्यक्ष मदत लांबणीवर पडत असल्याने ग्रामस्थांचा आक्रोश वाढू लागला आहे. यावेळी बच्चू कडू यांनी ग्रामस्थांना धीर देत सांगितले की, आमची साथ सदैव तुमच्यासोबत आहे. शासनाकडून तातडीने नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. या पाहणी दौऱ्यात विजय केदार, रोशन निमकर, रवी पवार, विजय वानखेडे, मंगेश देशमुख, सुरेंद्र सोनार, दीपक भोगाडे, मदन बावणे, भगवत दामोधर, वसंत वसुले, आनंद काळे, राजेश खडसे, देवेंद्र औतकर, संजय मेस्कर, सचिन पिसे तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सतीश मोहोळ आदी मान्यवर उपस्थित होते.

### पालकमंत्र्यांबाबत रोष

अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री पूरग्रस्त भागात न जाता वरुड व अमरावतीतील पक्षप्रवेश व दहीहंडी कार्यक्रमांना उपस्थित राहिले. त्यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

### सानुग्रह निधी देण्यास विलंब

पूरामुळे घरातील धान्य व जीवनावश्यक वस्तू वाहून गेल्या आहेत. चार दिवस उलटूनही नागरिकांना सानुग्रह निधी मिळालेला नाही. त्यामुळे शासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# धावत्या एसटी बसचे चाक निखळले

## सातेगावजवळ थरारक घटना | चालकाच्या समयसूचकतेने 11 प्रवासी सुखरूप

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.19 )-** तालुक्यातील गावंडगाव ते अमरावती या मार्गावर धावणाऱ्या एसटी बसचा आज सकाळी सातेगाव जवळ मोठा अपघात टळला. एमएच 06 एस 8232 क्रमांकाच्या बसचा मागील चाक नट-बोल्टमधून निखळले. सुदैवाने चालकाने प्रसंगावधान राखल्याने 11 प्रवासी सुखरूप बचावले.

सविस्तर माहिती अशी की, गावंडगाव ते अमरावती मार्गावर रोज सकाळी सात वाजता ही बस सुटते. विद्यार्थ्यांपासून ते



सदर घटनेचा चौकशी अहवाल प्राप्त झाला असून या घटनेस चौकशी अहवाला मध्ये जवाबदार कर्मचारी पाळी प्रमुख, दैनिक देखभाल करणारे यांत्रिक, वाहन परीक्षक व कामगिरी करणारे चालक यांना नियमित आरोपपत्र देण्यात आले आहे.

**अभिष बहुलकर, आगार व्यवस्थापक, दर्यापूर.**

कार्यालयीन कर्मचारी आणि नागरिक या बसने नियमित प्रवास करतात. आज दि.19 रोजी बस गावंडगाववरून निघाल्यानंतर सातेगावजवळ पोहोचताच बसच्या मागील बाजूचे चाक निखळून बस पासून बाजूला झाले. हा प्रकार चालकाच्या लक्षात येताच त्यांनी लगेच बस थांबविली. त्यामूळे एक मोठी दुर्घटना टळली.

### वाहनांच्या देखभाल दुरुस्तीवर प्रश्नचिन्ह

या घटनेमुळे प्रवाशांमध्ये मोठी भिती निर्माण झाली. प्रवासी सुरक्षित बचावले असले तरी परिवहन महामंडळाच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बसेसची वेळोवेळी देखभाल, तांत्रिक तपासणी न करता रस्त्यावर धावविण्यात येत असल्याने अशा घटना घडत असल्याचा आरोप प्रवाशांनी केला. दर्यापूर आगारातून अनेक जुनी व मर्यादा संपलेली वाहने मार्गावर धावत आहेत. बस ताब्यात घेताना चालकांनीही बसची योग्य तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु तपासणीशिवाय या बसेस प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण करत आहेत.प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देत आगार प्रशासनाने तत्काळ बसची तपासणी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे. या घटनेमुळे दर्यापूर आगाराच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

# जिल्हा परिषदेच्या आदेशाला केराची टोपली

- शिवर ग्रामपंचायतीचा भ्रष्टाचार प्रकरणात हलगर्जी
- ग्रा.पं.कर्मचारी चौकशीत दोषी, कारवाई मात्र शून्य





**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.19 ) -** तालुक्यातील शिवर ग्रामपंचायतीत शिपायाने घरकर वसुलीतील रकमेचा गैरवापर करून भ्रष्टाचार केल्याची गंभीर तक्रार ग्रामपंचायत सदस्य पंकज कदम यांनी वारंवार प्रशासनाकडे केली होती. मात्र ग्रामपंचायत प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने अखेर कदम यांनी 8 एप्रिल रोजी शिपायाला कार्यालयात कोंडून आंदोलन छेडत तात्काळ कारवाईची मागणी केली.

त्या वेळी ग्रामसेवकांनी दोन दिवसांत कारणे दाखवा नोटीस देण्याचे आश्वासन दिल्याने आंदोलन मागे घेण्यात आले. त्यानुसार 6 मे रोजी शिपायाला नोटीस देण्यात आली. शिपायाने 13 मे रोजी खुलासा सादर केला; परंतु तो समाधानकारक नसल्याने दुसरी नोटीस देण्यात आली. त्यावर शिपायाने कोणतेही उत्तर दिले नाही. परिणामी पंकज कदम यांनी 22 मे रोजी जिल्हा परिषद मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली. त्यानुसार 24 जून रोजी चौकशी होऊन शिपाई दोषी ठरला. भ्रष्टाचार व नियमबाह्य कामांबाबत जिल्हा परिषदेकडून कारवाईचे आदेश ग्रामपंचायत प्रशासनाला देण्यात आले. मात्र आदेशानंतरही दोन महिन्यांहून अधिक काळ लोटला तरी प्रशासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही. यामुळे ग्रामपंचायत प्रशासन भ्रष्ट कर्मचाऱ्याचे संरक्षण करत असल्याचा संशय व्यक्त होत आहे. ग्रामपंचायत सदस्य पंकज कदम यांनी प्रशासनाला दिलेल्या पत्रातून 15 दिवसांच्या आत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. जिल्हा परिषद मुख्याधिकाऱ्यांचा आदेश असूनही ग्रामपंचायत प्रशासनाने त्याला केराची टोपली दाखवली आहे, असा गंभीर आरोप कदम यांनी केला. या प्रकरणामुळे ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचाराबरोबरच प्रशासनाची निष्क्रियता व हलगर्जीपणा उघड झाला असून, लवकरच या वादाला तीव्र वळण मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# समाजभवनासाठी निधी कमी पडू देणार नाही - आ.उमेश यावलकर

## भोई समाज स्नेहसंमेलनात दिले आश्वासन

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.19 )-** भोई समाजाच्या मतदानातील योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. समाजभावनेसाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, असे आश्वासन देत त्यांनी समाज बांधवांना लवकरच भव्य समाज भवन उभारून देण्याची ग्वाही दिली. समाजाने जागा उपलब्ध करून दिल्यास त्यासाठी लागणारा निधी शासनाकडून मिळवून देण्यात येईल,असे आश्वासन मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार उमेश यावलकर यांनी दिले.

ते भोई समाज युवा फाउंडेशनच्या वतीने काठीवाले सभागृहात आयोजित स्नेहसंमेलन सोहळ्यात बोलत होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन म्हणून ते उपस्थित होते.

यावेळी गुणवंत विद्यार्थी सन्मान सोहळा, सेवानिवृत्त कर्मचारी-अधिकारी गौरव व




क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्काराचा कार्यक्रमसुध्दा घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुकुंद मोरे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून विदर्भ भोई सेवा संघाचे अध्यक्ष उकडराव सोनवणे, उद्योजक सुरेश वानखडे, प्राचार्य अरुण कावनपुरे, पत्रकार संजय गारपवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मत्स्य महर्षी, स्वर्गीय खासदार ज्योतीराम बर्वे यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. इयत्ता दहावी, बारावी व वैद्यकीय शिक्षणात उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य अरुण कावनपुरे यांनी केले. सूत्रसंचालन रवींद्र सुरजुसे यांनी तर आभार प्रदर्शन वसंत बावणे यांनी केले. या कार्यक्रमासाठी भोई समाज युवा फाउंडेशनचे अध्यक्ष सुखदेव सुरजुसे, उपाध्यक्ष प्रशांत सुरजुसे, सचिव दीपक लाड यांच्यासह पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले. सभागृहात मोठ्या संख्येने समाज बांधव, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.


# शासकीय वसतिगृहात 'हर घर तिरंगा' अभियान

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.19 ) -** दर्यापूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह येथे 'हर घर तिरंगा' अभियान उत्साहात पार पडले. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार 13 ते 15 ऑगस्ट 2025 या कालावधीत विविध देशभक्तीपर कार्यक्रम घेण्यात आले. सलग तीन दिवस राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. विद्यार्थ्यांची देशभक्तीपर गीत स्पर्धा रंगली तर शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेले बँड पथक विशेष आकर्षण ठरले. विद्यार्थ्यांनी तिरंग्यासह सेल्फी काढून संकेतस्थळावर अपलोड केल्या. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन वसतिगृहाचे गृहपाल



के. आर. यादव यांनी केले होते.



# नुकसानग्रस्त पिकांचा तातडीने पंचनामा करा-स्वप्नील गावंडे

## भाजपा पदाधिकाऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.19 )-** दर्यापूर ग्रामीण भाजपा मंडळातर्फे दि. 18 ऑगस्ट रोजी तहसीलदार दर्यापूर यांना निवेदन देण्यात आले. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले असून, तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना शासनामार्फत योग्य मोबदला देण्यात यावा, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली.

यावेळी तालुक्यातील पांदण रस्त्यांबाबत तहसील कार्यालयाकडून वर्गीकरणात्मक माहिती घेण्यात आली. तसेच सासन-रामापुर गावातील साचणाऱ्या पावसाच्या पाण्याच्या समस्येबाबत तहसीलदार व जलसंधारण विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा करून तातडीने तोडगा काढण्याच्या सूचना देण्यात आल्या.या निवेदनावेळी तालुकाध्यक्ष स्वप्नील गावंडे, विजयराव मेंढे, माणिकराव मानकर, अनिल कुंडलवाल, मदनराव बायस्कर, किरण देशमुख, रवींद्र ढोकणे, संदीप मोटे, विनय पावशे, विक्रांत तराळ, प्रदीप पुरी, रवींद्र राजपूत, रोशन कट्यारमल, उमेश नाकड, अनिल साखरे, रोशन गावंडे, कपिल गावंडे, श्रीकृष्ण डोंगरे, केशव बिजवाडे, निलेश चराटे, निलेश वैद्य, मनीष घाटे, ज्ञानेश्वर पाथरे, आबीत पटेल, रवींद्र पाचपोहे, जयवंत देशमुख यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आशा कर्मचाऱ्यांची वयोमर्यादा 65 वर्षे करावी!

## ऋतिक मालपे यांची महसूल मंत्र्यांकडे मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.19 ) -** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत 2007 पासून आशा कर्मचारी कार्यरत असून, राज्यभर मोठ्या संख्येने महिलांनी आरोग्य सेवेत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. मात्र अलीकडेच आरोग्य विभागाच्या सूचनांनुसार 60 वर्षे पूर्ण झालेल्या आशा कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त केले जात आहे. या निर्णयामुळे अनुभवी आशा च्या सेवेचा अंत होत असल्याने मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर डी.एम. एक्स ग्रुप महाराष्ट्र राज्याचे संस्थापक ऋतिक मालपे यांनी माननीय महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांना निवेदन देऊन आशा कर्मचाऱ्यांची वयोमर्यादा 60 वरून 65 वर्षांपर्यंत वाढवावी, अशी मागणी केली. त्यांनी सांगितले की, आशा सेविकांनी 15 ते 18 वर्षे आरोग्य क्षेत्रात काम केले असून, कोरोना काळात तर त्यांच्या कार्याची जागतिक स्तरावर दखल घेण्यात



आली आहे.

सध्या इतर विभागांमध्ये अंगणवाडी सेविका, मदतनीस तसेच अंशकालीन स्त्री परिचर यांचे सेवानिवृत्तीचे वय 65 वर्षे करण्यात आले आहे. त्याप्रमाणेच आशा सेविकांनाही हीच सुविधा मिळावी. तसेच सेवामुक्त करताना एकरकमी मदत किंवा पेन्शनची तरतूद करावी, अशीही मागणी करण्यात आली. निर्णय होईपर्यंत कोणत्याही आशा सेविकेला सक्तीने कार्यमुक्त करू नये किंवा नवीन नियुक्ती करू नये, असेही या निवेदनात स्पष्ट करण्यात आले.

# सालबर्डी नजीक उभारले जाणार नमो अहिल्यादेवी वटवन उद्यान

## पाच हेक्टर वनजमिनीवर 501 वडाच्या झाडांची लागवड



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.19 ) -** सालबर्डी जवळील जगद्गुरु संत राजेश्वर माऊली यांच्या मठाजवळील पाच हेक्टर वनजमिनीवर केवळ वडाच्या झाडांची लागवड करून नमो अहिल्यादेवी वटवन उद्यान साकारण्यात येणार आहे. राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या अनोख्या संकल्पनेतून या उपक्रमाला मूर्त रूप मिळणार असून, एकूण 501 वडाची झाडे लावली जाणार आहेत.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी संत राजेश्वर माऊली यांनी सुचविलेल्या या उपक्रमात वनविभागाचे सहकार्य असून, यामुळे पर्यावरणाचे संतुलन साधले जाणार आहे.

तसेच सालबर्डीच्या धार्मिक व आध्यात्मिक महात्म्यातही भर पडणार आहे. भाविकांना प्रदक्षिणेसाठी विशेष मार्ग उपलब्ध करून दिला जाणार असून, एका झाडाला तसेच 301 किंवा 501 झाडांना प्रदक्षिणा घालण्याची सोय राहणार आहे. भाविकांच्या सोयीसाठी प्रदक्षिणा मार्गावर बसण्याची सुविधाही करण्यात येणार आहे.

मोर्शी येथील मत्स्य विज्ञान महाविद्यालयाच्या भूमिपूजनावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी या उपक्रमाचा उल्लेख केला होता. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नमो अहिल्यादेवी वटवन चे ऑनलाइन उद्घाटन करण्यात आले होते.

### 23 ऑगस्टला होणार झाडांची लागवड

या वटवनात वडाच्या झाडांची लागवड येत्या 23 ऑगस्ट रोजी होणार असून, यावेळी जगद्गुरु संत राजेश्वर माऊली, खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार चंदू उर्फ उमेश यावलकर, भाजपाचे वरिष्ठ नेते उपेंद्र कोठेकर, जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, जिल्हाधिकारी, वनविभागाचे अधिकारी, स्थानिक सरपंच, ग्रामवासी तसेच भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

# मतदान चोर, खुर्ची सोड!

## नारेबाजी करित काँग्रेसचे कँडल आंदोलन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.19 ) -** मतदार यादीतील घोटाळ्यांविरोधात काँग्रेस पक्षाने अमरावतीत मतदान चोर, खुर्ची सोड या घोषणांसह भव्य कॅन्डल मार्च, मशाल मोर्चा काढून जोरदार निषेध नोंदवला. संध्याकाळी सात वाजता राजकमल चौकातून निघालेल्या या मोर्चामुळे परिसरात घोषणांचा गजर झाला आणि लोकशाही रक्षणाचा निर्धार दृढतेने मांडला गेला.

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांनी नुकत्याच पत्रकार परिषदेत मतदार यादीतील मोठ्या प्रमाणावरील घोटाळ्यांचा पर्दाफाश केला आहे. भारतीय जनता पक्षाने निवडणूक आयोगावर दबाव टाकून मतदार यादीमध्ये फेरफार केले आणि मतचोरीच्या मार्गाने सत्ता




मिळवल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. हा प्रकार केवळ राजकीय मुद्दा नसून, सामान्य मतदारांच्या मतदानाच्या पवित्र हक्कावर केलेला अन्याय असल्याचे काँग्रेस पक्षाने स्पष्ट केले आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने देशव्यापी चळवळ छेडण्याचा निर्णय घेतला असून, त्यानुसार अमरावती शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने अध्यक्ष बबलु शेखावत यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला. या वेळी माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, माजी महापौर विलास इंगोले, मिलिंद चिमोटे, प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार, प्रदेश सचिव आसिफ तवक्कल, महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष निलेश गुहे, विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख, अल्पसंख्याक सेल अध्यक्ष अब्दुल रफीक, समीर जवंजाळ यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

मोर्चात सहभागी कार्यकर्त्यांनी हातात मशाली व कॅन्डल्स धरून निषेधाच्या घोषणा दिल्या. 'मतदान चोर, खुर्ची सोड', 'लोकशाहीचा अपमान चालणार नाही', 'मतदारांचा हक्क हिरावून घेऊ नका' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. या आंदोलनाद्वारे मतदार यादीतील घोटाळे व लोकशाहीवर होत असलेल्या हल्ल्याचा तीव्र निषेध करण्यात आला.

# 'एंथे 2025' परीक्षेचे लॉन्चिंग

## आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड चा उपक्रम




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.19 ) -** देशातील अग्रगण्य टेस्ट प्रिपरेशन संस्था असलेल्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड (AESL) ने आपल्या 16 यशस्वी वर्षांच्या कार्याचा टप्पा गाठत 'एंथे 2025' (आकाश नॅशनल टॅलेंट हंट एक्झाम) या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची घोषणा केली आहे. दरवर्षी विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण करणारी ही परीक्षा इयत्ता 5 वी ते 12 वीतील विद्यार्थ्यांसाठी असून त्यांना स्पर्धात्मक परीक्षांना सामोरे जाण्यास तयार करण्याचा उद्देश आहे.

या परीक्षेतून विद्यार्थ्यांना एकूण 250 कोटी रुपयांपर्यंत शिष्यवृत्ती (100 टक्के पर्यंत) मिळणार असून, ती क्लासरूम, आकाश डिजिटल आणि इन्विक्टस कोर्सेसवर लागू होणार आहे. तसेच 2.5 कोटी रुपयांपर्यंतच्या रोख पारितोषिकांचीही सोय करण्यात आली आहे. यामुळे मेडिकल व इंजिनिअरिंगसारख्या क्षेत्रांत करिअर करण्याची आकांक्षा असलेल्या विद्यार्थ्यांना मोठी मदत होणार आहे. एंथे 2025 ही परीक्षा विद्यार्थ्यांना NEET, JEE, State CETs, NTSE आणि ऑलिम्पियाडसारख्या स्पर्धात्मक परीक्षांसाठी आकाशच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाचा लाभ मिळवून देणारी ठरणार आहे.

यासोबतच आकाशने 'इन्विक्टस ऐस टेस्ट' ही नवी शिष्यवृत्ती परीक्षा सुरू केली आहे. ही परीक्षा इयत्ता 8 वी ते 12 वीतील विद्यार्थ्यांसाठी असून, आकाश इन्विक्टस JEE ॲडव्हान्स्ड प्रिपरेशन प्रोग्रॅममध्ये प्रवेशासाठी महत्त्वाची ठरणार आहे. हा राष्ट्रीय स्तरावरील पात्रता व शिष्यवृत्ती परीक्षेचा उपक्रम असून, तो 24 ऑगस्ट, 31 ऑगस्ट आणि 7 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 10 ते दुपारी 1 या वेळेत होणार आहे. परीक्षा ऑनलाइन व ऑफलाइन दोन्ही पद्धतींनी उपलब्ध असून, अर्ज शुल्क 300 रुपये आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना 100 टक्के शिष्यवृत्ती व आकर्षक रोख पारितोषिके दिली जाणार आहेत.

> एंथे हे विद्यार्थ्यांच्या यशाचे प्रतीक बनले आहे. आम्ही प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये समस्यांचे निराकरण करण्याची आणि बदल घडवण्याची क्षमता आहे, या विश्वासाने शिक्षण सुलभ आणि परिणामकारक करण्यासाठी कटिबद्ध आहोत.
>
> **-दीपक मेहरोत्रा, सीईओ व एमडी AESL.**

